# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

## प्रेसनोट

**CB/36/2026**

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक ०६/०७/२०२६ |
|---|---|

**'वेश्या व्यवसायातुन एक अल्पवयीन व दोन पिडीत मुलींची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका '**

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.दिपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, श्री.प्रमोद शेवाळे, अपर पोलीस आयुक्त ( गुन्हे ) व श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त, ( गुन्हे शाखा ) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.गजानन कदम यांना दिनांक ०४/०७/२०२६ रोजी बातमीदारा मार्फत बातमी मिळाली कि, नवी मुंबई परिसरात महिला पुरवणारा गौतम नावाचा इसम हा ग्राहकांना १६ ते १७ वर्षाच्या मुलीचे ६०००/- रू घेवुन वेश्याव्यवसायाठी ग्राहकास हव्या त्याठिकाणी सोडतो. मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकाच्या मार्फतीने महिला पुरवणारा गौतम नावाचा इसमास संपर्क साधुन त्यास मुलींना घेवुन सतरा प्लाझा, गेट नंबर ०२, सेक्टर १९ ए, वाशी येथे येण्याबाबत कळविले. सदर ठिकाणी पोलीस पथकाने १८:१२ वा. छापा कारवाई केली असता आरोपी नामे गौतम रजंन मजुमदार, वय ३६ वर्ष, रा.तुलसी धाम, प्लॉट नंबर बी ०१ - ३४, रूम नंबर ३०४, सेक्टर १९, कोपरखैरणे, नवी मुंबई, मुळ राहणार पश्चिम बंगाल याने एक अल्पवयीन व दोन पिडीत मुलींना स्वत:च्या फायदयाकरीता वेश्या व्यवसायाकरीता आणले होते. त्याने अल्पवयीन व इतर दोन्ही पिडीत मुलींचे फोटो बनावट ग्राहकांस पाठवुन वेश्याव्यवसायाचा मोबदला म्हणुन ६०००/- हजार रू स्वीकारले होते.

सदर आरोपी विरूध्द एपीएमसी पोलीस ठाणे गु.र.नं.३४१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १४३(३), सह पोस्को कायदा कलम १७, तसेच पिटा ॲक्ट ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास एपीएमसी पोलीस ठाणे करत आहे. आरोपीला दिनांक ०५/०७/२०२६ रोजी ०४.३५ वाजता अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने दिनांक ०७/०७/२०२६ रोजी पावेतो त्याची पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी श्री. शैलेशकुमार आंचलवार, सहायक पोलीस आयुक्त, AHTU, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/गजानन कदम, सपोनि/योगेश देशमुख, पोहवा/२५०१ सविता म्हात्रे, पोहवा/२५०४ ज्योती अडकमोल, पोहवा/२५०७ पावडे, चालक पोहवा/४८०६ मोहिते, पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३४५२ कोलते व पोशि/४५४४ पाटील यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★

